# दि युनियन बँक ऑफ इंडिया एम्प्लॉईज को-ऑप.क्रेडिट सोसायटी लि., मुंबई

(नोंदणी क्र.बी ओ एम/आर एस आर/३५४/३.६.६७)
युनियन बँक बिल्डिंग, ४ था मजला, रुम नं.११, मुंबई समाचार मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.दूरध्वनी क्र. २२६२१४८४, ३५११४२४६/५२
WhatsApp No.: ९८३३१८५५८४ / ईमेल : ubicrsoc@gmail.com / Website : unionbankcreditsociety.com / Play store : UBI CR SOCIETY

## ५५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

**(फक्त सभासदांसाठी)**

दि युनियन बँक ऑफ इंडिया एम्प्लॉईज को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि. संस्थेची सन २०२२-२३ यावर्षाची ५५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शुक्रवार, दिनांक ११ ऑगस्ट, २०२३ रोजी सायं ठीक ४:३० वाजता रामा ॲण्ड सुंदरी वाटुमूल ऑडिटोरीयम, किशनचंद चेलाराम कॉलेज (के. सी. कॉलेज), दिनशॉ वाच्छा रोड, चर्चगेट, मुंबई -२० येथे आयोजित करण्यात आली आहे. कृपया सर्व सभासदांनी सभेस वेळेवर उपस्थित रहावे ही नम्र विनंती.

### सभेपुढील विषय सुची

१. दिनांक ०४ जून, २०२२ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२. ५५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित सभासदांची गैरहजेरी क्षमापित करणे.
३. सन २०२२-२०२३ यावर्षाच्या मान्य अंदाजपत्रकीय तरतुदीपेक्षा जास्त झालेल्या खर्चास मान्यता देणे.
४. सन २०२२-२०२३ यावर्षाचा अहवाल, नफा-तोटा व ताळेबंद पत्रकांस मंजुरी देणे.
५. सन २०२२-२०२३ यावर्षासाठी मा.संचालक मंडळाने सुचविलेल्या नफा वाटणीस मान्यता देणे.
६. सन २०२२-२०२३ यावर्षाच्या वैधानिक लेखापरीक्षण अहवाल व त्यावरील दोषदुरुस्ती अहवालाची नोंद घेणे.
७. सन २०२३-२४ वर्षाकरीता वैधानिक लेखापरीक्षकांची नेमणूक करणे.
८. सन २०२३-२४ या वर्षाकरीता अंतर्गत व कर लेखा-परीक्षकांची नेमणूक करणे व मानधन ठरविणे.
९. सन २०२३-२४ या वर्षाच्या मा. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या अंदाजपत्रकास मान्यता देणे.
१०. पोटनियम क्र. क-१.३, फ-१.३, फ-१.४, फ-१.८ मधील दुरुस्तीस मान्यता देणे.
११. संस्थेत नवीन सॉफ्टवेअर प्रणाली घेण्यास मान्यता देणे.
१२. मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणा-या विषयांवर विचार करणे.

व्यवस्थापक समितीच्या आदेशावरुन,

**(प्रशांत सुर्वे)**
मानद् सचिव

ठिकाण : मुंबई
दिनांक : २५/०७/२०२३

**सूचना :**

१. गणसंख्येअभावी सभा तहकूब झाल्यास सदरची सभा अर्ध्या तासाने घेण्यात येईल व त्यास गणपूर्तीची आवश्यकता राहणार नाही.
२. वार्षिक सर्वसाधारण सभेपुढील विषयासंबंधी काही प्रश्न असल्यास ते दि.०३/०८/२०२३ पर्यंत लेखी स्वरुपात आणून देणे.
३. संस्थेचा वार्षिक अहवाल, ताळेबंद व नफा तोटा पत्रक संस्थेच्या मुख्य कार्यालयात कार्यालयीन वेळेत सभासदांना पाहण्यास उपलब्ध आहे. तसेच संस्थेच्या वेबसाईटवर व वॉट्स ॲपद्वारे उपलब्ध होतील.
४. उपविधी क्र. घ.१.३ (४) अनुसार लाभांश जाहीर झालेल्या तारखेपासून तीन वर्षाच्या मुदतीत स्विकारावा अन्यथा संस्थेच्या राखीव निधीत जमा करण्यात येईल. २०१९-२०, २०२०-२१, २०२१-२२ सालातील लाभांश अद्याप घेतला नसल्यास ३१ डिसेंबर, २०२३ पुर्वी संस्थेत संपर्क करावा.

**२०२३-२४ सालाचे सभासद सहकार प्रशिक्षण हे वार्षिक सभेच्या ठिकाणी दुपारी ३:४५ वाजता आयोजित केले आहे**